२५ फेब्रुवारी २०१०

# कुलगुरूंना स्वायत्तता मिळणार

## केंद्रीय नियोजन मंडळाचे सदस्य डॉ. नरेंद्र जाधव यांची माहिती

सकाळ वृत्तसेवा

पुणे, ता. २५ : उच्च शिक्षण आणि संशोधनाची गुणवत्ता सुधारण्याबरोबरच कुलगुरू निवड प्रक्रियेमध्ये पारदर्शकता आणण्याच्या उद्देशातून 'राष्ट्रीय उच्च शिक्षण आणि संशोधन आयोग' (नॅशनल कमिशन ऑन हायर एज्युकेशन अँड रिसर्च) विधेयक लवकरच आणण्यात येणार आहे. यामध्ये विद्यापीठ अनुदान आयोग (यूजीसी), अखिल भारतीय शिक्षण आणि प्रशिक्षण परिषद (एआयसीटीई) आणि राष्ट्रीय तंत्र शिक्षण परिषद (एनसीटीई) या उच्च शिक्षणाशी संबंधित संस्था वगळल्या जाणार असून, 'एनसीएचईआर' ही सर्वोच्च शिखर संस्था असेल. यामध्ये विद्यापीठ आणि कुलगुरूंना स्वायत्तता देण्यात आली आहे.

केंद्रीय नियोजन मंडळाचे सदस्य आणि 'एनसीएचईआर'च्या कृती दलाचे (टास्क फोर्स) सदस्य डॉ.

### ९० टक्के उद्दिष्ट साध्य होणार

**डॉ. नरेंद्र जाधव म्हणाले, "यूजीसी, एनसीईटी, एआयसीईटी या उच्च शिक्षणातील संस्थांची ९० टक्के शक्ती यंत्रणा राबविण्यामध्ये जात असल्यामुळे उच्च शिक्षणाच्या विकासामध्ये त्या केवळ दहा टक्के वाटा उचलतात. 'एनसीएचईआर' या नव्या संस्थेमुळे यंत्रणा कार्यान्वित करण्यासाठी दहा टक्के, तर विकासासाठी ९० टक्के हे उद्दिष्ट साध्य होणार आहे."**

ही माहिती दिली. या कृती दलाने या संदर्भात महाराष्ट्र आणि गोवा राज्यातील कुलगुरूंशी बुधवारी चर्चा केली आणि त्यांची मते जाणून घेतली. या वेळी डॉ. माधवन मेनन, अपूर्वा नंद, प्रा. गोवर्धन मेहता आणि उमाशंकर हे सदस्य उपस्थित होते.

जाधव म्हणाले, "उच्च शिक्षणाच्या गुणवत्तेमध्ये सुधारणा घडवून आणण्यासाठी हा आयोग कार्यान्वित करण्याचा निर्णय केंद्र सरकारने घेतला आहे. त्यासाठी दोन महिन्यांपूर्वी स्थापन

तयार केला असून, तो मनुष्यबळ विकास मंत्रालयाच्या संकेतस्थळावर ठेवण्यात आला आहे. या आयोगाच्या कार्यपद्धतीसंबंधी यूजीसी, एआयसीईटी आणि एनसीईटीच्या प्रमुखांशी चर्चा करण्यात आली असून, त्यांचीदेखील मते आणि शिफारशी जाणून घेतल्या आहेत. कृती दलाने बंगळूर, त्रिवेंद्रम, चेन्नई, भोपाळ, अहमदाबाद आणि पुणे येथे शिक्षण क्षेत्रातील तज्ज्ञांशी चर्चा केली आहे."


ते म्हणाले, "या आयोगाच्या

पारदर्शकता यावर भर देण्यात आला आहे. कुलगुरुपदासाठी योग्य व्यक्तींची राष्ट्रीय सूची (नॅशनल रजिस्ट्री) करण्यात येणार आहे. कार्यक्षम आणि विद्यापीठाला दिशा देत पुढे नेण्याची क्षमता असलेली प्रत्येक तज्ज्ञ व्यक्ती अर्ज दाखल करून या सूचीमध्ये समाविष्ट होऊ शकते. राज्य सरकार विद्यापीठ आणि शिक्षणतज्ज्ञांशी चर्चा करून त्यातील पाच जणांच्या नावाची शिफारस कुलपतींकडे करू शकेल आणि त्यातून एकाची कुलगुरुपदी निवड होईल. नव्या पद्धतीमध्ये विद्यापीठ आणि कुलगुरूंना स्वातंत्र्य आणि स्वायत्तता देण्यात आली असून, कोणताही निर्णय घेण्यासाठी संबंधित यंत्रणा किंवा केंद्र सरकारच्या परवानगीची गरज भासणार नाही. विद्यापीठांना गुणवत्तेच्या आधारे अनुदान



# दु:खाला कवटाळण्यापेक्षा पुढे वाटचाल करणे महत्त्वाचे- सुशिलकुमार शिंदे

## डॉ. नरेंद्र जाधव यांना मारवाडी फाऊंडेशनचा पुरस्कार प्रदान



नाशिक येथे आयोजित कार्यक्रमात मारवाडी फाऊंडेशनच्या वतीने देण्यात येणारा 'भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मृती पुरस्कार' केंद्रीय नियोजन आयोगाचे सदस्य डॉ. नरेंद्र जाधव यांना प्रदान करतांना केंद्रीय ऊर्जामंत्री सुशिलकुमार शिंदे. समवेत आ. डॉ. वसंत पवार, आ. जयप्रकाश छाजेड, आ. सुभाष चव्हाण, उद्योगपती देवकिसन सारडा, फाऊंडेशनचे अध्यक्ष गिरीश गांधी आदी.

**नाशिक, ७ फेब्रुवारी / प्रतिनिधी**

दुःखाला कवटाळण्यापेक्षा सातत्याने पुढे जाण्यासाठी आयुष्यातील धडपड आवश्यक आहे. मात्र ही धडपड संपली तर कोणी पुढे जाऊ शकणार नाही, असे प्रतिपादन केंद्रीय ऊर्जा मंत्री सुशिलकुमार शिंदे यांनी केले.

येथील परशुराम साईखेडकर नाट्यमंदिरात मारवाडी फाऊंडेशनच्या वतीने देण्यात येणारा 'भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मृती पुरस्कार' भारतीय नियोजन मंडळाचे सदस्य डॉ. नरेंद्र जाधव यांना शिंदे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. त्याप्रसंगी ते बोलत होते. पुरस्काराचे स्वरूप शाल, श्रीफळ, स्मृतीचिन्ह, पाच लाख रूपयांचा धनादेश असे आहे. यावेळी शिंदे यांनी मारवाडी फाऊंडेशनच्या वतीने दिला जाणारा हा पुरस्कार कौतुकास्पद असून जाती, धर्म याच्या पलिकडे पाहण्याची दृष्टी देणारा असल्याचे सांगितले. हा पुरस्कार परिस्थिती, धर्म, आपल्या कर्तृत्वाशी झगडत ज्याने देशाला संपूर्ण प्रकाश दिला अशा महामानवाच्या नावाने देण्यात येत आहे याचा अभिमान आहे. डॉ.आंबेडकरांनी घटनेने दिलेल्या अधिकाराच्या माध्यमातून राष्ट्रजोडणीचे काम होत आहे. यामुळे संस्कृतिच्या मार्गाने जाण्याचा नवा विचार मिळाला. दलितांच्या दारिद्र्य पाचवीलाच पूजलेले आहे. मात्र ते घासत बसण्यापेक्षा त्याला लाथ मारत नवा मार्ग स्वीकारणे गरजेचे आहे, असेही शिंदे म्हणाले. सत्कारास उत्तर देतांना डॉ. जाधव यांनी डॉ. आंबेडकरांच्या नावाने मिळालेला पुरस्कार हा आपण आपला बहुमान समजतो, असे सांगितले. डॉ. आंबेडकरांना दलितांचे कैवारी म्हटले जाते. ते कैवारी असले तरी युगप्रवर्तक होते. जाती जमातीच्या संकुचित मनोवृत्तीला छेद देणारे होते, असे सांगत त्यांनी आपल्या पुरस्काराचे, यशाचे श्रेय संपूर्ण कुटुंबाला दिले. डॉ. आंबेडकरांमुळे दलित समाजाची अस्मिता जागृत झाली. माणसाला जगण्याच्या हक्काची जाणीव झाल्याने परिवर्तनाला सुरूवात झाली. 'शिका-संघटीत व्हा व लढा द्या' हा विचार नसून आत्मप्रतिज्ञा असल्याचे जाधव यांनी सांगितले. सामान्यांमध्ये असामान्यत्व लपलेले असते याचा शोध घेता यायला हवा. हा शोध मला 'माझा बाप...' मध्ये लागला. माझ्या वडिलांनी शिक्षणाची आस धरल्यामुळे आजपर्यंतची वाटचाल होऊ शकली, असेही ते म्हणाले. यावेळी व्यासपीठावर आ. जयप्रकाश छाजेड, आ. डॉ. वसंत पवार, फाऊंडेशनचे अध्यक्ष गिरीश गांधी, सत्यनारायण नुवाल,अजय संचेती, जुगलकिशोर सारडा, देवकिसन सारडा, जयप्रकाश जातेगांवकर आदी उपस्थित होते.

Lok Satta

8/2/10